(Marathi)

1029
9/91

1361

19


P

IMPERIAL RECORD
RECEIVED
21 NOV. 1930
DEPARTMENT
1361
mar

॥ वंदेमातरम् ॥

# राष्ट्रीय पद्यावली.

## [ प्रभातफेरीचीं गाणीं ]



भाग १ ला व २ रा.

| |
|---|
| या पद्यावलींत इतर पद्यावलींमधील मनोहर गाणीं देण्यांत आलीं आहेत. |

किंमत १ आणा.

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No. 1361
Date 12-1-72
GOVT. OF INDIA

## पद १

लाभेल याच काळा । स्वातंत्र्य भारताला

मर्द सिंह सारा । बोले कुणी बिचारा ।

बोलेल तेची बोला । स्वातंत्र्य भारताला ॥धृ०॥

सविता कदा न जेव्हां । राही निशा न तेव्हां ।

मग कां न शक्य तेला ॥ स्वातंत्र्य० ॥ २ ॥

हें काळ चक्र फिरतें । स्थिरता मुळीं न त्यातें ।

म्हणूनी बघाल डोळा ॥ स्वातंत्र्य० ॥ ३ ॥

देवो कुणी न देवो । घेवो कुणी न घेवो ।

न टळे अतां विधिला ॥ स्वातंत्र्य० ॥ ४ ॥

श्रद्धा पराक्रमाची । निष्ठा निजात्मतेची ।

सामर्थ्य हे कृतिला ॥ स्वातंत्र्य० ॥ ५ ॥

अन्य स्वतंत्र होतो ॥ येई सदैव दृष्टि ।

संदेहता कशाला ॥ स्वातंत्र्य० ॥ ६ ॥

परमेश जो जगाचा । या तोचि भारताचा ।
दे छत्र चामराला ॥ स्वातंत्र्य० ॥ ७ ॥
नव लाभ जन्म देई । नव तेज तेज दावी ।
नव दिव्य दिव्यतेला ॥ स्वातंत्र्य० ॥ ८ ॥

एस. एस. मोरे.

---

( चाल--२ सुखाचा शोध. ) पद २

कायदे भंग करण्याला, चला व्हा तयार मरण्याला ॥
जुलमी कायदे आतां, बंधूनो मोडण्याकरितां ॥
उठाहो स्वस्थ कां बसलां, चला व्हा तयार मरण्याला॥
असें हें कृत्य करितांना, येईल चीड ब्रिटीशांना ॥
त्रास देतील आपणाला, तरि व्हा तयार मरण्याला ॥
गोळीबार करतील, शेवटीं सूळीं देतील ॥
तरी ही भिऊं नका त्याला, चला व्हा तयार मरण्याला॥

भ्याड हो उठा लवलाही, मनाची लाज धरा कांहीं ॥
असे कां आळसी बनलां, चला व्हा तयार मरण्याला ॥
विनवि कवि विश्वंभर, बंधूनो बांधाहो कंबर
आंग्लाई नष्ट करण्याला, चला व्हा तयार मरण्याला ॥

---

## पद ३ रें

राष्ट्रीय झेंडा फडकत आला। हरहर महादेव बोला ॥
तीन रंगींचा राष्ट्रीय झेंडा आलों घेवोनी ॥
या झेंड्याचें रक्षण करण्या विसरूं नका कोणी ॥
प्रभातवेळीं मंगलदायी जागे व्हा आतां ॥
साखर झोंपा कसल्या घेतां राष्ट्र जळत असतां ॥
गांधी, नेहरू लढती मिठागरीं स्वातंत्र्यासाठीं ॥
लढतां लढतां दोघे पडले शत्रूच्या हातीं ॥
खादी वापरा देश उद्धरा स्वातंत्र्या गांठा ॥
दारू सोडा कां पीता तो नरकाचा सांठा ॥

थोर विभूति व्रत हें उचला राष्ट्रकार्य आहे ॥
ध्या त्या प्रभुचें नाम एकदां राष्ट्र सोडवा हें ॥
चला वंदूं या प्रातःकाळीं राष्ट्रीय झेंड्याला ॥
हीच विनंती करितों आम्हीं याहो लढण्याला ॥ १ ॥

---

## पद ४ थें

उठा हो मर्द युवकांनों ॥ उठा हो हिंद बालांनों ॥
उठा हो वृद्ध तरुणांनों ॥ उठा हो आर्य भगिनांनों॥१॥
लागली आग देशाला ॥ घोरतां तरिहि या काला ॥
पुढारी आज जो झाला ॥ मिळे त्या बंदिवासाला ॥२॥
कुणाचे बंधू वा पुत्र ॥ कुणाचे तात वा मित्र ॥
पकडिले आज सर्वत्र ॥ मांडिलें घोर हें सत्र ॥ ३ ॥
तयाची लाज कोणाला ॥ जागवा स्वाभिमानाला ॥
पूर्वजा स्मरुनि व्हा आज ॥ सामना द्यावया सज्ज॥४॥

आठवा नंदबाळाला ।। आठवा रामचंद्राला ।।
आठवा लोकमान्यांला ।। महात्मा गांधी जय बोला ।।५।।
पाळुनी गांधी आज्ञेला ।। वापरा खादी या काला ।।
स्वदेशी वापरायाला ।। शरम कां हिंद पुत्राला ।।६।।
बांगड्या वाण हें सतिचें ।। विदेशी वापरायाचें ।।
विटंबन हिंदुधर्मांचें ।। त्यजावें भगिनीनों साचें ।। ७ ।।
तुम्हांला पाहिजे सत्ता ।। आळसा या तरी लत्ता ।।
उद्यमा अंगिकारितां ।। येई स्वातंत्र्य आणि हाता ।।८।।
विदेशी वस्तू अस्पर्शी ।। वापरी तोचि अस्पृश्य ।।
बहिष्कारोनी परदेशी ।। स्वराज्या स्थापूं या देशी ।।९।।

---

## पद ५ वें

हिंद कंगाल बन्युं अेनो ख्याल करो ।।
पैसा जाय लंडनमा ये बंद करो ।। हिंद कंगाल बन्युं ।।

।हिंमत धरे मर्द बनो शुरा थईनें रणी चढो ॥
देश खातर जान जाये पग पाछो न धरो ॥
मोट मर्द बनविनें तमे बहार पडो ॥२॥ हिंद कंगाल बन्युं० ॥
विलायती वस्त्रनें लात मारी देशनें दिपावजो ॥
मफत मळे विदेशी तोये ना तमे अे पहेरजो ॥
कापड विदेशी लेवूं तमे बंध करो ॥३॥ हिंद कंगाल बन्युं० ॥
धर्म भव विदेशी बिडीयो लाखो करोडो जाय छे ॥
अक्कल विनाना आदमीथी ना हजु छोडाय छे ॥
अेवा शोख न मालाने बंद करो ॥४॥ हिंद कंगाल बन्युं० ॥
रोटी वीना बंधु करोडो देशमां आजे मरे ॥
वीना मोते कंईक मरना कहेता आंसुडा झरे ॥
अेवा दीन बंधुनी जरा व्हार करो ॥५॥ हिंद कंगाल बन्युं० ॥

भाग दुसराः—

## पद ६

प्यारा भारत हमारा हमारा ।
इसमें क्या है किसिका ईज्ञारा ॥ धृ. ॥
चेत जावो अब तुम देशवालों ।
बिगडी हालतको अपनी समालो ॥
सत्यका तुम बजादो नगारा । प्यारा भारत. ॥

बन गुलाम जो तुम रहे हो ।
दुःखावस्थामें क्यों सो रहे हो ।
कबतक होगा ऐसे गुजारा । प्यारा भारत. ॥

बिघडे भारतको अपने बनालो ।
नाम व्हालिंटरमें लिखा लो ।
फिरतो हो पार बेडा हमारा । प्यारा भारत. ॥

कदम पिछेको हटने न पाये ।
सान भारत की घटने न पाये ।
धर्मका झेंडा हमने समारा । प्यारा भारत. ॥

कमलादेवी सरोजिनीबाई ।
प्यारी माता पडे जेलमांही ।
हिन्दमें वह करेंगी उजारा । प्यारा भारत. ॥

उठो दोस्तो अब बदला जमाना ।
कलंक भारत का होगा मिटाना ।
जैलमें घर बनेगा हमारा । प्यारा भारत. ॥

अब क्या मरनेसे हमको है डरना
सीख लेना है हंस हंस के मरना ।
नाम गांधीका सबने पुकारा । प्यारा भारत. ॥

## पद. ७ ( चाल साधी )

राष्ट्रीय गीत बोल मनुजा । नेत्र जरा खोल ॥ म० ॥
दारू सोडा दुध प्याहो । येईल तुम्हांला जोर ॥ म० ॥
व्यसनें सोडा पैसा बचवा । मोडा सरकारची खोड ॥ म० ॥
पैशा परी पैसा जावूनी । झाला कमी अपुला जोर ॥ म० ॥
गांठा गांठा स्वातंत्र्याला । अभिमान धरा थोर ॥ म० ॥
देशामाजीं कहर गुदरला । शांति धरा थोर ॥ म० ॥
देश मिळविणें कर्तव्य अमुचें । जागा हो मग घोर ॥ म० ॥
दारू पिवूनी देह नाशिला । आतां तरी तूं सोड ॥ म० ॥
पैसा मिळवूनी व्यर्थची गेला । व्यसनें असती चोर ॥ म० ॥

---

## पद. ८

समरास सज्ज झाला ॥ सत्याग्रही निघाला ॥
मोहीम रोखुनीयां ॥ रणशूर घेऊनीयां ॥
संग्राम झुंजण्याला ॥ सत्याग्रही निघाला ॥ १ ॥

सामर्थ्य वाढवोनी ॥ जगतास चेतवोनी ॥
काळाशीं खेळण्याला ॥ सत्याग्रही निघाला ॥ २ ॥

सत्यासमान नाहीं ॥ जगीं वंद्य अन्य कांहीं ॥
पुरुषार्थ पेरण्याला ॥ सत्याग्रही निघाला ॥ ३ ॥

श्रेष्ठांत श्रेष्ठ थोर ॥ सेनानी क्रांतिसार ॥
स्वातंत्र्य घोषणेला ॥ सत्याग्रही निघाला ॥ ४ ॥

अध्यात्म योग भारें ॥ विश्वास जो भरारे ॥
स्वातंत्र्य सेवनाला ॥ सत्याग्रही निघाला ॥ ५ ॥

योगींद्र तो महात्मा ॥ जो हिंद देश आत्मा ॥
थरकांपती जयाला ॥ सत्याग्रही निघाला ॥ ६ ॥

यशवंत वीर माझा ॥ विजयी करूनि काजा ॥
हा आश्रमांत यावा ॥ सत्याग्रही निघाला ॥ ७ ॥

## पद ९

चरखा चला चला के । लेंगे स्वराज्य लेंगे ॥
मलमल जो है विदेशी । आने को गज मिलेगा ॥
खादी नही त्यजेंगे ॥ लेंगे स्वराज्य लेंगे ॥
बहोत्तर करोड रुपया । परदेश जा रहा है ॥
उसकू बचा बचा के । लेंगे स्वराज्य लेंगे ॥
चरखेकि झनझनाटें । रणभेरियां बजेंगे ॥
अंग्रेज को सुनाके । लेंगे स्वराज्य लेंगे ॥
यह हक है हमारा । तन जान सेभी प्यारा ॥
मरने नहीं डरेंगे । लेंगे स्वराज्य लेंगे ॥
हम सब परेड फौंजी । कप्तान हमारा गांधी ॥
आज्ञा उसीकी लेंगे । लेंगे स्वराज्य लेंगे ॥
तेहतीस करोड फौजी । रण साथ ये चलेंगे ॥
गांधी हुकूम करेंगे । लेंगे स्वराज्य लेंगे ॥

चरखा ही तोफ बनेगी । तकली बनेगी बरची ॥
गोलेसे सूतके हम । लेंगे स्वराज्य लेंगे ॥

## पद १०

कुणाला दास्य तें प्यारें ॥ कुणाला आत्महित सारें ॥
महात्मा एक तें ठावें ॥ स्वदेशा प्राण अर्पावे ॥
कुणाला नोकरी प्यारी ॥ कुणाला देशची प्यारी ॥
परानें देश वेढिला ॥ कसा तुम्हां स्वार्थ तो रुचला ॥
ऊशाला सर्प असतांना ॥ घोरतां झोंप घेतांना ॥
मराठ्या मर्द होतासी ॥ कसा तूं हीन बनलासि ॥
जरा धर स्वाभिमानाला ॥ आठवूनीं शूर शिवबाला ॥
आठ वर्षाचें तें बाळ ॥ रस्थी नाचे जणू काळ ॥
जिवाला जीव देऊं या ॥ स्वराज्या पूर्ण स्थापूं या ॥

# पद ११

भगवा झेंडा उदय होण्याचा समय जवळ आला ॥
उठा बंधूनों तयार व्हा तुम्ही स्वराज्य घेण्याला ॥ ध्रु० ॥
सुरेल सनया, शिंगें, कर्णे, पंचम स्वर धरिला ॥
डंका, नौबती झडूं लागल्या, नाद ब्रह्म नाभिं भरला ॥१॥
मावळा मराठा सभोंवार घन दाट खडा झाला ॥
खास रिसाला शोभुनि गेला, हातीं घेऊन भाला ॥ २ ॥
लाठी, बोथाटी, दारू गोळा तयार करविला ॥
भाला, बरची, कमाल तिरचीं घेऊनि शिलेदार आला॥३॥
आजूबाजू स्वार दौडती, सांड बैठकिला ॥
जरि पटक्याच्या बिनि आघाडीस हत्ती खास झुलला ॥४॥
थय् थय् वारू नाच नाचती जीन त्यांस चढला ॥
टप टप टापा उडूं लागल्या लगाम खेचून धरिला ॥ ५ ॥
मर्द गड्यांनीं रक्त अर्पूनी भगवा झेंडा बनविला ॥

शिरावांचूनी लढाई करोनी मुरारबाजी रणीं पडला ॥६॥
बा, झेंड्या तव जतनासाठीं तानाजी लढला ॥
खुल्या हातावर वार झेलतां वैकुंठासी तो गेला ॥ ७ ॥
श्री छत्रपती शिवराया हा अवतारी झाला ॥
समर्थ गुरूनीं प्रसाद दिधला झेंडा भगवा बनविला ॥ ८ ॥

## पद १२

बंधू हो हिंदुस्थान हा अमुचा ! झाला आँग्ल देशाचा ॥
पारतंत्र्यामधें गेलीं बहु वर्षें। आतां तरी जागे व्हा साचे ॥
मिळवा परत आपल्या देशाला। सोडवा आर्य मातृभुमीला॥
आळा घाला व्यसनांना । उपदेशूनी आपूल्या बंधूंना ॥
मिळेल स्वातंत्र्य आपणाला । सुख होईल हिंदुस्थानाला ॥
अशी ही वेळ महत्वाची । पुन्हा न मिळे बंधूनों साची ॥
न होईल एकी आजी आमुची । तरी उद्यां क्रांति घडेल साची॥
अंजन घालूनी गांधीजीनीं । उठविले हिंदुस्थान आजी ॥
गांधींनीं स्वदेह झिजविला । केवळ स्वराज्य स्थापण्याला ॥
गांधींचे वृत्त हे असें साचें । आम्हां फळ देईल श्रमांचें ॥

---:०:---

प्रकाशकः—

सिताराम एस्. मोरे बुक बाईंडींग शॉप,
२२२ गिरगांव मुंबई नं. ४.

( लेखकः—श्रीयुत लक्ष्मण अ. खानविलकर )

मुद्रकः—

बा. ना. आंबर्डेकर पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस,
मुंबई नं. ४